प्रकरण पाचवे

# वाळवा तालुक्यातील महत्त्वाचे स्वातंत्र्य सैनिक व हुतात्मा स्मारके

# वाळवा तालुक्यातील महत्वाचे स्वातंत्र्य सैनिक व त्यांचा सहभाग

१. श्री. रामचंद्र कृष्णाजी पाटील

२. श्री. डी. जी. देशपांडे

३. श्री. बाबूजी पाटणकर

४. श्री. रंगराव दादा पाटील

५. श्री. लक्ष्मण गणेश कुलकर्णी

भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये हाजारो व्यक्तींनी भाग घेतला आणि ऐकेकट्याने किंवा संघटीत होवून प्रतिकार केला. त्यामध्ये अनेकांना आपल्या प्राणांचे बलिदान करावे लागले. मालमत्ता गमवावी लागली. तुरूंगवासाच्या हालआपेष्टा सहन कराव्या लागल्या आणि हकनाक आरोपाच्या सावटाखाली लपून छपून जीवाच्या भितीने भटकत आयुष्य काढावे लागले.

ब्रिटीश राजवट सुरू होण्याअगोदरच्या कालखंडातील स्वातंत्र्य संग्रामाची आणि तो लढा देणाऱ्या व्यक्तींची नोंद अनेक इतिहास ग्रंथांनी घेतली आहे. नोंद झाली नाही ती स्वातंत्र्याच्या वेदीवर आत्मबलीदान करणाऱ्या पुढच्या काळातील स्वातंत्र्य सैनिकांची या स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाला सीमा नव्हती आणि प्राणपणाने लढून त्यांनी केलेल्या अस्मितेला तोड नव्हती.

स्वातंत्र्य सैनिक म्हणजे ज्याने फक्त तुरूंगवासच भोगला आहे अशी व्याख्या न करता स्वातंत्र्य संग्रामात या ना त्या रुपाने भाग घेतला व ज्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारे हाल सोसावे लागले आहेत तो स्वातंत्र्य सैनिक अशी व्याख्या करुन वाळवा तालुक्यातील महत्वाच्या स्वातंत्र्य सैनिकांच्या स्वातंत्र्य लढ्याचा आढावा -

## १) श्री. रामचंद्र कृष्णाजी पाटील :

रामचंद्र कृष्णाजी पाटील यांचा जन्म १८९९ साली झाला. जन्मानंतर अवघ्या दुसऱ्या वर्षी त्यांच्या वडिलांचा मृत्यु झाला. त्यांच्या पालनपोषणाची सर्व जबाबदारी त्यांचे चुलत भाऊ व आईवर पडली. त्यांचा चुलत भाऊ सखाराम तुकाराम पाटील यांना सर्वजण आप्पा म्हणत. रामचंद्र पाटलांना सर्वजण चंद्रु म्हणून हाक मारत. शैक्षणिक कालात त्यांना टिळकांचा केसरी वाचण्याचा छंद जडला. त्यात ब्रिटीश विरोधी जोरदार लेख असत शिवाय

त्या काळात म.गांधींच्या चळवळीलाही जोर आला होता. त्या सर्व बातम्या ऐकून ब्रिटीश विरोधी त्यांचे विचार तयार होत होते.[१]

त्यावेळी कामेरी गावामध्ये दंडा पाटीलकी चालू होती. दंडा पाटीलकी म्हणजे गावच्या पंचायतीच्या शिपायाने वादी लावलेला दंडा पाळीपाळीने गावातील प्रत्येक घरात आणून टाकला की त्या घरातील कर्त्या पुरूषाने त्या रात्री चावडीच्या राखणीसाठी जायचे हा दंडा पाटीलकीचा नियम होता. या पध्दतीला चंद्रु पाटलाने विरोध केला कारण ही दंडा पाटीलकी म्हणजे शुध्द गुलामगिरीच होती. ज्या घरातून कोणी राखणीसाठी येत नाही ते घर आपल्या विरोधी आहे असे ब्रिटीश सरकार समजत. चंद्रुने गावातील ही पध्दत बंद झाली पाहीजे असे जेष्ठ पुढाऱ्यांना सांगितले. त्यामध्ये दादा बाळा पाटील, कृष्णा रामजी पाटील व गंगाराम चिवटे यांचा समावेश होता. पण या पुढाऱ्यांनी चंद्रुला सांगितले ब्रिटीशांविरोधी चळवळ चालविणे अवघड होईल तेंव्हा तू तुझी चळवळ चालू कर आम्ही तुला सहाय्य करू.

या आश्वासनाने चंद्रूला चांगलाच हुरूप आला. म्हादू पाटील, शंकर भाळवणे, लिंगू आण्णा कापसे, गणपती शिंदे या सर्वांना चंद्रुने ब्रिटीशांविरोधी संघटीत केले.

जाने. १९२० ला कामेरी मध्ये पहाटे ४ वाजता सर्वांना एकत्र करून ''नही रखना, नही रखना, जालीम सरकार नहीं रखना'' अशा घोषणा देत प्रभात फेरी काढली. त्यानंतर रोज पहाटे कामेरी गावामध्ये असा आवाज घुमू लागला.[२] अशा तऱ्हेने त्यांनी १९२० पासून राजकारणात सक्रिय सहभाग घेण्यास सुरवात केली. चंद्रुच्या या कृत्याने घरातील सर्वजण अतिशय संतप्त झाले पण चंद्रुने सर्वांकडे दुर्लक्ष केले.

दुसरा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला तो म्हणजे सत्यशोधक चळवळीचा सत्यशोधक तमाशा मंडळ गावात स्थापन करून त्याद्वारे ब्रिटीश विरोधी आवाज उठवण्याचा व लोकांना संघटीत करायचा प्रयत्न त्यांनी केला. या तमाशामध्ये कलावंत म्हणून शंकर भाळवणे, म्हादू दाजी, ज्ञानू कुंभार या तमाशात नाच्याची भुमिका करून देशसेवा करू लागले. हळूहळू ब्रिटीश विरोधी आवाज उठवून लोकांना संघटीत केले. चंद्रु कारभारी महात्मा

गांधीजींच्या सभेस हजर असत चळवळीचा विचार व रूपरेषा गांधीजी कार्यकर्त्यांना समजावून सांगत व चंद्रु कारभारी गांधीजींचे विचार आपल्या सर्व कार्यकर्त्यांना गांधीजींच्या भाषेत बोलून दाखवत व ब्रिटीश विरोधी जनतेमध्ये आवाज उठवण्याचे मनोधैर्य कायकर्त्यांना देत असत. १९२० पासून सतत १० वर्षे लोकांत जागृती करणे व कार्यकर्ते संघटीत करणेचे कार्य त्यांनी केले.[३]

महात्मा गांधीजींनी १९३० मध्ये कायदेभंगाचा आदेश देशवासीयांना दिला. सातारा जिल्ह्यामध्ये संघटीत झालेल्या कार्यकर्त्यांनी कायदेभंग चळवळ म्हणून शिराळा तालुक्यात जंगल सत्याग्रह केला. त्या सत्याग्रहाचे नेतेपण चंद्रु कारभारी यांनी केले. या सत्याग्रहाचेवेळी त्यांना अटक झाली. २३-९-१९३० पासून ७-३-१९३१ पर्यंत तुरूंगवासाची शिक्षा झाली. तसेच वेगवेगळ्या कलमाखाली ५००रू., ५० रु. , व ३० रु. असा दंड झाला. १९३१ ला त्यांची तुरूंगातून सुटका झाली . आता त्यांनी पहिल्यापेक्षा दुप्पट गतीने कामस सुरवात केली त्यांचे गाव व घर चळवळीचे केंद्रस्थान बनले.[४]

कामेरीमध्ये वेगवेगळ्य ठिकाणी कार्यकर्त्यांच्या बैठकी आयोजीत करून चंद्रु कारभारी त्यांना मार्गदर्शन करु लागले. जत्रा, कुस्त्या, उत्सव अशा ठिकाणी हजर राहून सभा गाजवणे, ब्रिटीश विरोधी वातावरण लोकांमध्ये निर्माण करणे असे कार्य चालू असताना सामान्य शेतकऱ्याला त्रास होवू नये याकडे पण लक्ष देत. त्यावेळी वाळवा व शिराळा तालुक्यात गुन्हेगारांची टोळी कार्यरत होती. ती शेतकऱ्यांची पिके चारणे, दरोडे घालणे, असा धंदा करत. या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी गावोगावी त्यांनी पिक संरक्षण सोसायट्या स्थापन करायला लावल्या व गरीब शेतकऱ्यांचा कैवारी होवून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला.[५]

चंद्रु कारभाऱ्यांचे असे कार्य चालू असतानाच त्यांचे संसाराकडे मात्र दुर्लक्ष झाले. त्यांनी आपल्या लहान मुलांना देखील चळवळीच्या कामासाठी राबवले होते. बाबासाहेब हा

त्यावेळी १२-१३ वर्षाचा होता. प्रभात फेऱ्या काढणे, कार्यकर्त्यांना निरोप देणे, पोलीसांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे इ. कामे बाबासाहेब करीत असे.

एकदा तर प्रभात फेरी काढत असताना पोलीसांनी बाबासाहेबाला पकडून जोरदार मारले तो घरी आल्यावर त्याची नाता राधाबाईने ते पाठीवर काळेनिळे वळ पाहिले. चंद्रु कारभारी घरी आल्यावर राधाबाईने पाठीवरील वळ सदरा वर करून त्यांना दाखवले. त्या म्हणाल्या "तुमची चळवळ होतेय पण पोराच्या पाठीवर बघा पोलीसांनी काय केलय ते?" त्यावर कारभारी हसत म्हणाले ते होय? पोलीसांनी स्वतंत्र भारताचा नकाशा माझ्या पोराच्या पाठीवर काढलाय असे सांगून प्रसंगाचे गांभीर्य कमी केले.

निरोपाचे कामी किंवा टपाल पोहोच करणेचे कामी लहान मुलांचा पोलीसांना संशय येत नसे म्हणून चंद्रु कारभाऱ्यांनी बाळकृष्ण विष्णू पाटील (बाळकू डॉक्टर), टी.टी. गुरव, सदा कापसे, बाबासाहेब अशासारख्या मुलांचा गट करून त्यांच्यावर जबाबदारी सोपवत असत व ही मुले हरणाच्या चपळाईने व मांजराच्या पावलांनी ही जबाबदारी पार पाडीत असत.

१९३७ साली कॅप्टन एस.पी. मोहिते यांनी आमदारकीचा राजीनामा दिला त्यानंतर झालेल्या पोट निवडणूकीत चंद्रु कारभारी बिनविरोध निवडून आले.[६] सातारा जिल्ह्यातील जनतेने व कार्यकर्त्यांनी त्यांच्या नेतेपणावर शिक्का मारला. आमदार झाल्यामुळे त्यांच्या कार्याला आणखीन गती आली व जबाबदारीही वाढली. चळवळीमध्ये नेता अग्रेसर असला पाहीजे या भावनेने त्यांनी १९३९ साली वैयक्तीक सत्याग्रहामध्ये अपूर्व चैतन्यमय पध्दतीने भाग घेतला. क्रांतीकारकांचे व शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी वैयक्तिव सत्याग्रहाला जाताना ते १०१ बैलांच्या बैलगाडीतून वाजत गाजत जनतेमध्ये चैतन्य पसरवून इस्लामपूरच्या गांधी चौकामध्ये वैयक्तिक सत्याग्रह केला. तेथेच पोलीसांनी चंद्रु कारभाऱ्याला अटक केली व ताकारी मार्गे येरवड्याला पाठवण्यात आले. तुरूंगातून सुटून आल्यानंतर ब्रिटीश विरोधी उठावाचे काम आणखीन जोमाने केले.

८ ऑगष्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी गवालिया टँक मुंबई येथे सभा घेवून इंग्रजांना 'भारत छोडो' चा इशारा केला या सभेस चंद्रु कारभारी हजर होते. अटक वॉरंट निघाल्याची बातमी कळताच कारभारी मुंबईतच भूमिगत झाले. भूमिगत राहून मुंबई ते कामेरी हा प्रवास रत्नागिरीमार्गे त्यांनी चालत केला. या प्रवासासाठी त्यांनी एक महिना खर्च करावा लागला. कारण रस्त्यावरील गावांना भेटी देणे व ब्रिटीशां विरुध्द आवाज उठविणे असे मार्गदर्शन करीत त्यांनी कामेरी पर्यंतचा प्रवास केला.

चळवळीची दिशा ठरवण्यासाठी राष्ट्रसेवा दलाच्या तरुण कार्यकर्त्यांची मिटींग कामेरी मध्ये राजाराम पांडू पाटील यांच्या वाड्यामध्ये घेण्याचे ठरवले. त्या मिटींगसाठी बरेच भूमिगत कार्यकर्ते हजर राहीले होते. कारभारी त्या मिटींगला मार्गदर्शन करऱ्यासाठी येणार आहेत. हे पोलीसांना कळताच पोलीसांनी त्या वाड्यावर छापा टाकून अनेक कार्यकर्त्यांना अटक केली. कारभारी मिटींगला येण्या आधिच छापा पडल्यामुळे कारभारी सापडले नाहीत.

कोणत्याही गावात सभा घेतली तरी पोलीसांना कळणार म्हणून कारभाऱ्यांनी मल्लीकार्जुन डोंगरावर सभा बोलावली. कारण पोलीसांनी जरी छापा टाकला तरी डोंगरावरून २०-२५ मैलांची टेहळणी करता येत असल्यामुळे कार्यकर्त्यांना तेथून पसार होणे सोपे होते. या सभेस पांडू मास्तर, नाना पाटील, बर्डे गुरूजी, के.डी. पाटील, यशवंतराव चव्हाण, शंकर बोगर, बाबूराव चरणकर, निवृत्ती काका, धन्वंतरी दादा, विनायकराव थोरात इ. कार्यकर्ते हजर होते.[७] मिटींगमध्ये इस्लामपूरच्या कचेरीवर तिरंगा झेंडा लावण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला गेला व त्या मोर्चाचे विभागवार नेतृत्व नाना पाटील, पांडू मास्तर, बर्डे गुरूजी यांनी करावे असे ठरले.

कामेरी, येडेनिपाणी, कुरळप, येलूर इ. भागातून आलेल्या लोकांचे नेतृत्व पांडू मास्तरांनी केले. तो मोर्चा इस्लामपूरच्या खडी जवळ थांबवून त्यांनी या मोर्चास जोरदार मार्गदर्शन केले. या मोर्चात त्यांच्यावर पकड वॉरंट असल्यामूळे त्यांना सहभागी होता आले

नाही. भूमिगत राहूनच तुम्ही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केल्याखेरीज क्रांतीचा आवाज उठणार नाही, चळवळ थंड पडेल अशा तऱ्हेच्या कार्यकर्त्यांच्या अग्रहामुळेच ते भूमिगत राहिले होते.

१९४२ साली इस्लामपूरच्या मोर्चावर पोलीसांनी बेछूट गोळीबार केल्याने लोकांमध्ये घबराट निर्माण झाली होती. म्हणून कारभाऱ्यांनी गावोगावी मिटींगा बोलवून जनतेला दिलासा दिला. नंतर मोजक्या कार्यकर्त्यांची सभा कामेरीच्या तुकाराम कृष्णा पाटील यांच्या मळ्यात बोलवली त्या सभेस नाना पाटील, बर्डे गुरूजी, पांडू मास्तर, शंकर बोगर, धन्वंतरी दादा, बाबूराव चरणकर, विनायकराव थोरात, नागनाथ नायकवडी, एस.बी. पाटील कामेरी, के.डी. पाटील, यशवंतराव चव्हाण असे कार्यकर्ते उपस्थित होते.[८]

या सभेमध्ये सरकार अडचणीत आणण्याचे धोरण ठरले. हे धोरण समजावून सांगताना त्यांनी टेलिफोन तारा तोडणे, पोस्ट व बँका लुटणे, पगार वाहतूक करणाऱ्या रेल्वे लुटणे का आवश्यक आहे याचे स्पष्टीकरण केले. कारण टेलिफोन तारा तोडल्यामुळे व पोस्ट लुटल्यामुळे स्थानीक अधिकाऱ्यांचा व शासनाचा संबंध तुटेल आणि देशामध्ये गोंधळ माजेल, नोकरशाही गोंधळून जाईल भूमिगत कार्यकर्त्यांविषयीच्या बातम्या स्थानिक नोकरांना शासनापर्यंत पोहचविता येणार नाहीत. तसेच बँका वाहतूक करणाऱ्या आगगाड्या लुटल्या तर सरकारला ऐतद्देशीय नोकरांचा पगार वेळेवर भागविता येणार नाही. त्यांना पगार वेळेवर मिळाला नाही कि ते सरकारच्या विरोधात उभे राहतील. सर्व देशात ब्रिटीश सत्तेविरुध्द असंतोषाचा डोंब उसळेल. त्यामुळे ब्रिटीशांना सत्ता सोडून जाणे भाग पडेल. असे विचार तरुण कार्यकर्त्यांना समजावून सागितल्यामुळे सातारा जिल्ह्यातील अनेक तरूण आपल्या जीवाची बाजी लावून कामाला लागले. वाळवा तालुक्यातील कार्यकर्त्यांनी तर कहरच केला. येडेनिपाणी व इटकरे परीसरातील टेलीफोन तारा हा हा म्हणता भुईसपाट झाल्या.

चंद्रु कारभारी. पांडू मास्तर, नागनाथ नायकवडी, एस्.बी.पाटील, म्हादू सावंत, तुकाराम सावंत, आण्णा चंदु पाटील, सदा कापसे. शंकर भाळवणे, बाबूराव

बेळगावकर, गंगाराम पवार, कोचा नाना, गणपत शिंदे, गणपती तुकाराम पाटील, टी.टी गुरव, बापू गुरव, बाबासो पाटील, बाळकू डॉक्टर, गणी येलूरकर, छगन पाटील, गजाभाऊ पाटील व रघू पाटील अशा कार्यकर्त्यांच्या हिंमतीवर या क्रांतीकारक कार्यक्रमाची ज्योत प्रथम कामेरीमध्ये पेटली. कार्यकर्ते सर्व भागात संचार करून जेथे जमेल तेथे सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत होते. नागनाथ नायकवडी व एस्.बी. पाटील यांनी कुंडलची बँक लुटली व अनेक कार्यकर्त्यांनी कुंडलजवळ पगाराची आगगाडी लुटली. चंद्रु कारभारी, बाबूजी पाटणकर, गणपा सेक्रेटरी, म्हादू सावंत यांनी डिग्रज जवळ गाडी अडवून पोस्टाच्या बॅगा बाहेर काढून पेटवून दिल्या.[१] ब्रिटीश सरकारला सर्व मालमत्ता धडाधड पेटताना दिसली.

सरकारने अनेक प्रयत्न करूनसुध्दा चंद्रु कारभारी पोलीसांना सापडत नाहीत म्हणून सरकारने चंद्रु कारभाऱ्या विरुध्द स्पेशल मोहीम उघडली. तरी कारभा-याचे भूमिगत राहुन उठाव करण्याचे कार्य चालु होते. १९४२ सालापासून सातारा जिल्यातील क्रांतीकारकांनी ब्रिटीश सरकारला 'देमाय धरणी ठाय' करून सोडले. चंद्रु कारभा-यासारखा खंबीर नेता क्रांतीकारकांना आवाज देत होता. यामुळे ब्रिटीश सरकारला जोपर्यंत चंद्रु कारभारी अटक होत नाही तोपर्यंत सरकारला कोंडीत पकडण्याचे काम कमी होणार नाही. सबंध देशामध्ये अशी सरकारला कोंडीत पकडण्याची चळवळ फोफावली तर ब्रिटीशांना राज्य करणे अवघड जाईल. म्हणून जनतेमध्ये आवाज उठवणारा, जनता संघटीत करणारा चंद्रु कारभा-याचा क्रांतीकारक पकडल्याशिवाय अशा चळवळीचे सत्र थांबणार नाही. म्हणून वाट्ट्रेल ते प्रयत्न करून चंद्रु कारभा-याला पकडले पाहिजे. या हेतूने त्याची सर्व जमीन जप्त केली. कारभा-याचे चुलत भाऊ राऊ पाटील व यशवंत बाळा पाटील, ज्ञानदेव पाटील यांना पकडून नेले. कारभा-यांना साथ करणा-या अनेक कार्यकर्त्यांना अटक करून त्यांचे हाल करण्यास सुरवात केली. तरी कारभारी डगमगले नाहीत. गांधीजींनी जबाबदार कार्यकर्त्यांना सरकारच्या स्वाधीन होण्यास आदेश दिला त्यामुळे कारभारी

१४.९.१९४४ रोजी स्वताः होवून कामेरी गावच्या सोसायटी ऑफीसमध्ये पोलीसांच्या स्वाधीन झाले.[१०]

त्यांना १४.९.१९४४ पासून ३०.१.१९४६ पर्यंत शिक्षा भोगावी लागली. तब्बल १६ महिन्यांचा तुरूंगवास भोगून गावात आल्यानंतर वाळवे तालुक्यात दरोडेखोरांची टोळी क्रांतीकारकांच्या विरोधात राहून ब्रिटीश पोलीसांना साथ करून क्रांतीकारकांना सतावू लागली आहे याची जाणीव कारभा-यांना झाली.

## दराडेखोरांशी शत्रुत्व :

ऐतवडे बु॥ या गावी २२.५.१९४६ रोजी क्रांतीकारकांची गुप्त बैठक बसली असता त्यारात्री या दरोडेखोरांनी केलेल्या गोळीबारामध्ये बाबुराव कोकाटे व प्रताप पाटील या दोन तरूण क्रांतीकारकांची हत्या झाली. या दरोडेखोर टोळीचा मोरक्या कामेरी गावचा होता. याची खंत त्यांना वाटायला लागली. त्यांनी कामेरी गावामध्ये एका जाहीर सभेत कामेरी गावाला चांगला लौकीक मिळत चालला आहे. तो या गावामध्ये दरोडेखोरांच्या टोळींचे अस्तित्व ठेवून गावाला बदनाम करण्याचा जर कोणी प्रयत्न केला तर त्याच्या विरोधात मोहिम उघडावी लागेल. दरोडेखोरांनी आपली ताकद देशाच्या सेवेसाठी वापरावी. क्रांतीकारकांना त्रास देण्याचा मार्ग त्यांनी सोडून दयावा नाहीतर नाईलाजाने त्यांना जनतेमध्ये उठाव करून पोलीसांच्या ताब्यात दयावे लागेल. असा खणखणीत इशारा जाहीर सभेमध्ये दिला. त्यामुळे त्या दरोडेखारे टोळीतील लोक कारभा-यांना आपला शत्रु समजू लागले.

कामेरी गावच्या ओढयाच्या शेजारी एका शेतात गुन्हेगारांची टोळी आलेली आहे. हे समजताच कारभारी प्रत्यक्ष भेट घेवून समजावून सांगून त्यांना हा मार्ग बदलण्यास प्रवृत्त करून ही मंडळी आपल्या शब्दा बाहेर जाणार नाहीत या जबरदस्त विश्वासाने कारभारी त्यांची भेट घेण्यास शेताकडे निघाले. त्यांचे मित्रमंडळ 'तिकडे जावू नका ते लोक घात

करतील' असे बजावून सांगत होते. पण कारभा-यांना स्वत:बद्दल विश्वास होता. माइ-याकडे डोळा वर करून पाहण्याचे नैतिक धाडस कोणत्या गुन्हेगाराचे होणार नाही असा त्यांना विश्वास होता. म्हणून कारभारी गुन्हेगारांची टोळी बसलेल्या शेताकडे वळले.

दरोडेखोरांना कारभारी आपल्याकडे येत आहेत हे दिसताच त्यांच्यात कुजबूज सूरु झाली. एवढयात योगायोगाने पोलीसांचा ताफा दरोडेखोरांना पकडण्यासाठी त्याच शेताकडे येत होता. हे कारभाऱ्यांना माहित नव्हते . टोळीतील लोकांना एका बाजूस कारभारी व त्यांच्या विरूध्द बाजूने पोलीस आपल्याकडे येत असलेले स्पष्ट दिसत होते. गुन्हेगार टोळीला कारभारी आपल्याला पकडून देण्यासाठी पोलीसांना घेवून आले आहेत असे वाटून त्यांचा राग अनावर झाला आणि पोलीस जवळ येण्याच्या आत टोळीतील लोक कारभा-याकडे पळत आले आणि रागाच्या भरात कारभारी काय बोलायच्या आत गुन्हेगारांनी कारभा-यांचा सजीव देह निर्जीव करून टाकला.[११]

सबंध देशात चैतन्य निर्माण करणारा कारभारी, सबंध देशाला जागा करणारा कारभारी वयाची २६ वर्षे ब्रिटीश सत्तेविरूध्द गर्जनाकरणारा कारभारी कार्तिक महिण्यात १९४६ साली आपल्या गावातीलच धर्तीवर निर्जिव झाला. देश जागा करून स्वत: झोपला, तो कधी न उठण्यासाठीच.

देशाच्या कल्याणासाठी गुंडगिरी निपटून काढायची या ध्येयासाठी झटत असताना काही गुंडांच्या हातून त्यांची हत्या झाली म्हणजे ख-या अर्थाने ते हुतात्मा झाले.

## २. श्री. डी. जी. देशपांडे :

दिगंबर गोविंद देशपांडे यांचे मुळगांव अंकलखोप त्यांचा जन्म १९ मे १९१६ रोजी अंकलखोप येथे झाला. त्यांना ६ भाऊ व ३ बहीणी अशी एकूण ९ भावंडे होती त्यात डी.जींचा नंबर आठवा होता. त्यांच्या घरची परिस्थीती हालाखीची व गरिबीची होती. अत्यंत कठीण परिस्थीतीतून त्यांनी १९४१ ला बी.कॉम पर्यंत शिक्षण घेतले. -

(अहमदाबाद) आणि सी. ए. होण्याच्या प्रयत्नाला ते लागले पण महाविद्यालयाचे शिक्षण घेत असतानाच भोवतालची पारतंत्र्याची परिस्थीती त्यांना अस्वस्थ करीत होती. आपणही देशाच्या स्वातंत्र्यासाठी काहीतरी केले पाहीजे ही भावना अंतकरणात उफाळून येत होती. या भावनेतून १२ ऑगस्ट, १९४२ रोजी पुण्यात अच्युतराव पटवर्धन व शिरूभाऊ लिमये यांची भेट घेतली. या दोघांनी त्यांना सातारा जिल्हयात काम करावे असा सल्ला दिला. त्यांनी आपल्या कार्याला प्रारंभ केला. प्रत्येक तालुक्यात जावून कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. लढयाचा पहिला निदर्शनाचा टप्पा तालुका, तालुक्यात मोर्चा काढून सुरू करावयाचा असे ठरले. भूमिगत लढयाच्या प्रत्येक संघटनेशी आणि तिची यंत्रणा उभारण्यामध्ये सर्व जिल्हयातील सर्व विभागांची ते स्वतः संपर्क साधून कार्य करीत राहीले. या नंतर ते डी. जी. या नावाने परिचित झाले.[१२]

डी. जी. देशपांडे भूमिगत चळवळीत मध्येराहून उघडपणे काम करीत होते. त्यांना भूमिगत अवस्थेत 'बहिर्जी नाईक' असे म्हणत असत. सरकारला त्यांचा कधीच संशय आला नाही. कारण त्यांच्या थोरल्या डॉ बंधूचे नांव डी. जी. देशपांडे असल्याने त्या डी. जींच्या मागे वॉरंट असे आणि या डी. जींचा सरकारला थांगपत्ताच लागत नसे. त्यामुळे ते उघडपणे सर्वत्र संचार करून साहित्य सामग्री, अर्थिक मदत सर्व संघटनांना पोहोचवू शकत होते. याशिवाय कार्यकर्त्यांच्या खटल्यांच्या वेळी वकीलांकडे आणि कोर्टातही प्रत्यक्ष हजर राहत असत.

## इंग्रज गव्हर्नरला मारण्याचा अयशस्वी प्रयत्न :

त्यांच्या कार्यातील त्यांनी सांगितलेला एक रोमांचकारी प्रसंग असा - इंग्रज गव्हर्नर सातार्‍याला भेट देणार असे जाहीर झाल्याने डी. जी. आणि किसन वीर यांनी कोल्हापूरच्या श्री जाधव यांच्या स्टुडिओ मधून एक प्रेशर बॉम्ब व काही प्रेशर टिकल्या घेतल्या. ते दोघे दुपारी ४ वाजता रेल्वे स्टेशनवर आले. रहिमतपूरची २ तिकीटे काढली गाडीत बसले तर प्रत्येक डब्यापुढे तीन चार पोलीस येवून उभे राहीले. बाकाच्या एका कोपर्‍यात डी. जी. व

दुस-या कोप-यात किसन वीर बसले. बॉम्बचे साहित्य ठेवलेली पिशवी मोसंबी व डाळींब यांनी भरलेली होती. ती समोरच्या फळीवर ठेवलेली होती. डी. जी. लगेच खाली उतरले व त्यांनी हवलदाराला विचारले 'आज हा बंदोबस्त कशासाठी? कोण येणार आहे?' तेव्हा तो म्हणाला 'येथे साखर कारखाना आहे आणि लोक साखर चोरून नेतात म्हणून त्यांचा तपास करण्यासाठी हा बंदोबस्त आहे'. त्यांनी लगेच त्याला त्यांची मोसंबी व डाळींबीची पिशवी दाखविली तेव्हा तो म्हणाला यात काय मोसंबी डाळींबी आहेत तुम्ही तुमच्याजवळ ठेवा व निवांत बसा.[१३]

दोघेजण रात्री रहिमतपूर स्टेशनवर उतरले कुत्र्यांनी भुंकून जाग आणू नये म्हणून रस्ता सोडून आडरानातून एक सव्वाला दादा साखळकर यांचे घरी गेले. तेथे कासेगांवकर वैद्य व पांडूतात्या बोराटे होतेच. गव्हर्नरची सकाळी ८ वाजता कुपर कारखान्याला भेट असल्याचा कार्यक्रम सातारच्या ननोहर पंत भागवत वकीलांकडून समजला. ताबडतोब रात्री जावून जरंडेधरच्या खिंडीत सिगरेट टीन एवढा प्रेशर बॉम्ब पूरून ठेवला त्याच्या वरच्या बटनावर एक बारीकशी दगडाची कपरी ठेवली आजुला बाजूला प्रेशर टिकल्या इतस्ततः विखुरल्या आणि ते निघून गेले. गव्हर्नरच्या गाडीच्या प्रेशरने तो बॉम्ब उडणार होता व त्यात त्याची गाडी ते व त्यांचे सुरक्षा रक्षक यांचा शेवट ठरलेला होता. पण सर्व रस्त्यांची तपासणी करता त्या टिकल्यांमुळे तो पुरलेला बॉम्ब जवळपास कुठेतरी असल्याची सुचना नोंदविण्यात आली सर्व वाहतूक बंद करण्यात आली गव्हर्नरची भेट रदद् करण्यात आली पुण्याहून मिलीटरी स्कॉड आणण्यात आले. नंतर तो बॉम्ब काढण्यात आला. पण तोपर्यंत डी. जी. सातारा रोडला येवून दाखल झाले होते. अशा प्रकारे पोलीस पहारा असूनसूध्दा युक्त्या क्लुप्त्या करून उघडपणे भूमिगत कार्य करण्याचे काम त्यांनी केले.[१४]

त्यानंतर त्यावेळी सातारा जिल्हा लष्कराच्या ताब्यात देण्याचा विचार वरिष्ट पातळीवर वेगाने सुरू झाला. अशावेळी भूमिगत कार्यकर्त्यांनी अल्पकाळ जिल्हा सोडून बाहेर जावे असे ठरविण्यात आले. त्यांच्या वाटखर्चीसाठी बाहेर राहण्याच्या खर्चासाठी पैसे

जमविण्याकरीता डी.जी. किसनवीर, धन्वंतरी अशी तिघांची कमिटी नेमन्यात आली. या मोहिमेत त्यांनी काळा बाजारवाल्यांकडून पाच हजार, दहा हजार या प्रमाणे ऐंशी हजार जमविले. ते लोक नको म्हणत असतानाही त्यांना पावत्या दिल्या मात्र त्यापैकी एकाचीही पावती इंग्रज सरकारला दाखविण्याचे धाडस झाले नाही. एवढी त्यांना दहशत वाटत होती.

## प्रतीसरकारास सहयोग :

प्रतीसरकारच्या सर्व केसेसना त्यांची मदत होत होती. सरकारी बँका लुटणे, गुदामावर हल्ले, रेल्वे जाळणे, तारा तोडणे या कार्यक्रमामध्ये त्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे. तसेच सरकारच्या गुप्त बातम्या मिळविणे, त्या भूमिगत कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविने आजारी भूमिगतांची सूश्रुषा करणे, प्रत्येक भूमिगतांच्या कुटूंबासाठी अर्थिक मदत उपलब्ध करणे असे कितीतरी कामे उघडपणे करता येत असल्याने त्यावेळी त्यांनी केलेली आहेत.[१५] हा लढा एकत्रित बांधण्यासाठी त्यांचा फार मोठा सहभाग होता.

एकदा डी. जी. देशपांडे यांनी मुंबईहून रेल्वेने एक सायक्लोस्टाईल मशिन आणले. त्यावर 'स्वतंत्र भारत' या नावाचे पत्रक काढण्यात यावे ती पत्रके गटास देण्यात यावीत असे ठरविले. अशा रितीने या भूमिगत लोकांची संघटना, तिची यंत्रणा उभारण्यात आली. या सर्वांशी सतत संपर्क राखून डी. जी. देशपांडे यांनी या सर्वांना एक संघपणे काम करण्यास मदत केली. ब-याच गटामध्ये त्यांनी कामामध्ये भाग घेतला होता. मुंबईहून जेव्हा सायक्लोस्टाईल मशिन आणले तेव्हा ते एका मोठया पुढच्या खोक्यात होते. रेल्वेने ते घेवून डी. जी. कराड स्टेशनवर पहाटे पाच वाजता उतरले. प्रत्येक स्टेशनवर पोलीस पार्टी होती. त्यांनी उतरल्याबरोबर ते खोके बसलेल्या पोलीस हवालदाराजवळ ठेवले व त्यांला 'लॅट्रीनला जावून येतो' म्हणून सांगीतले. त्याने विचारले कोठे जाणार आहात? देशपांडे म्हणाले मला इस्लामपूरला जावयाचे आहे. हनुमान सर्व्हिसची गाडी ६ वाजता स्टेशनवर येते इतक्यात गाडी आल्याचे पोलीस हवालदाराने डी.जीं.ना सांगितले. डी. जी. ते खोके घेवून गाडीत

जावून बसले. पुढे कासेगांवात उतरले व तिथून ते सामान वाटेगावास पोहोचविले अशा प्रकारे उघडपणे त्यांनी भूमिगत चळवळीत कार्य केले.[१६]

**पंडीत जवाहरलाल नेहरुंची भेट :**

१९४५ साली भूमिगत कार्यकर्त्यांबरोबर त्यांनी पंडीत जवाहरलाल नेहरूंची भेट घेतली व अच्युतराव पटवर्धन यांची मुंबईत भेट घेतली व चर्चा केली . त्यावेळी महात्मा गांधी व पंडीत नेहरू नुकतेच जेल मधून सुटून आले होते. एकंदरीत मोर्चे संघटीत करणे, प्रतीसरकारची स्थापना, जिल्हयाचे संघटन असे त्यांच्या कार्याचे स्वरूप होते.

डी. जीं. चे विशेष म्हणजे १९४२ पासून १९४६ पर्यत पकड वॉरंट होते परंतू या काळात ते कधीच पोलीसांच्या हाती लागले नाहीत. कारण त्यांनी कधीच फोटो काढला नव्हता . त्यामुळे त्यांना ओळखण्याचे साधन पोलीसांना कधीच सापडले नाही.

एकंदरीत साता-याचे प्रतीसरकार स्थापनारी आणि स्थापल्यानंतर पुढे चालविणारी अशी त्यागी, विचारी, बुध्दीमान आणि मानवतावादी माणसे होती. त्यात डी.जी. आबा अग्रेसर होते. डी. जी. देशपांडे यांनी स्वातंत्र्य लढयाच्या आंदोलनात हेरगिरीचे अत्यंत महत्वाचे काम केले आहे.[१७]

आज डी. जी. देशपांडे यांचे वय ८५ असून ते इस्लामपूर मध्ये वास्तव्य करतात. अभ्यासकांना मुलाखत देतात व प्रतीसरकारच्या संबंधी अनेक जुण्या आठवणी सांगत असतात.

# बाबुजी पाटणकर

## अल्प परिचय / क्रांतीकार्याची प्रेरणा :

प्रतिसरकारच्या आंदोलनातील उसळत्या रक्ताच तडफदार उमदं नेतृत्व म्हणजे क्रांतिवीर बाबुजी पाटणकर गरीब कष्टकरी आईवडीलांच्या पोटी जन्म घेतलेला एकूलता एक मुलगा, म्हातरपणाचा आधार. एक दिवस अचानक आई वडीलांना नसांगता आपले गुरुजी बर्डे यांच्या समवेत चलेजावच्या आंदोलनात स्वत:ला झाकून दिले. त्यावेळी त्यांचे वय २० किंवा २१ वर्षाचे असेल. परंतू १४, १५ व्या वर्षीच त्यांना देशाच्या स्वातंत्र्य कार्याचं बाळकडू मिळालं होत. बर्डे गुरुजींनी अस्पपृश्य मुलांना सवर्ण मुलांच्या बरोबरीची वागणूक दिल्यामुळे कासेगांवच्या नागरीकांशी सामना / संघर्ष करावा लागला. शिवाय त्यांनी मिठाच्या सत्याग्रहात स्वत:ला झोकून दिले. या सर्व गोष्टींचे बाळकडू बाबुजींना १४ ,१५ व्या वर्षापासून मिळाले होते. त्व्हा पासून बाबुजी असहकाराची चळवळ, स्वदेशीची चळवळ , दारुबंदी , सत्याग्रही आंदोलन अशा कार्यक्रमात अग्रेसर होते. [१८]

## चलेजाव आंदोलन व बाबुजी :

महात्मा गांधीनी ८ ऑ. १९४२ ला चलेजावची घोषणा केली. आणि 'करा किंवा मरा' , 'करेंगे या मरेंगे' हा कृतिमंत्र वाऱ्यासारखा देशभर पसरला. देशतील तरुणच नव्हेतर आबालवृध्द पेटून उठला. बाबुजी गांधीजींच्या शिकवणीच्या या मुशीत तयार झालेला जवान ८ व ९ ऑगष्टच्या क्रांती घोषणेनंतर ब्रिटीशांनी सर्व पुढाऱ्यांना गजाआड केले. आणि तिथून संदेश घेवून गेलेल्या भागातील लोकांनी स्वत:च नेतृत्व करुन तालुका, तालुक्याच्या कचेरीवर प्रचंड मोर्चे काढले. त्यात अनेक लोक मृत्यूमुखी पडले म्हणून कार्यकर्त्यांनीं भूमिगत राहून आंदोलन सुरु केले. ब्रिटीश सत्ता न मानता आमच्या पध्दतीने

स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून आम्ही वागणार असा व्यवहार विकसित होत गेला. या सर्व बाबतीत बाबुजी पाटणकर हे धडाडीने आघाडीवर होते.[१९]

## गुंडांचा बंदोबस्त :

स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळी इंग्रजी सत्तेबरोबर देशात गुंडांची गुंडगिरी ही लोकांना सतावत होती. तेंव्हा त्यांचा बंदोबस्त करण्याच्या कामी बाबुजी आघाडीवर होते. - पेठेचा म्हादू रामोशी हा वाटेगावचा दत्तू पाटील यांचे कडील बंदूक काढण्यास गुंड घेवून दरोडा घालण्यास आला. त्यावेळी वाटेगावात कोणी स्वातंत्र्य सैनिक हजर नव्हते. पांडूरंग पाटील यांना ही दरोड्याची बातमी लागल्यावर त्यांनी बाबुजींची भेट घेतली कारण त्यांना स्वत:ला बंदूक चालवता येत नव्हती. बाबुजी तावडतोब त्यांच्या बरोबर गेले दत्ताजीराव पाटलांच्या घरासमोरील तुळशीवृंदावना आडून गोळीबारास सुरवात केली दरोडेखोरांना वाटले किती लोक आहेत कोण जाणे ते घाबरले आणि पळू लागले. पळत असता त्यांनी पण गोळीबार केला. त्यातील कांही छरे बाबुजीच्या दंडात घुसले व गोळीबारात कांही दरोडेखोर बळी पडले. बाबुजींनी एकट्यांनी हे सर्व धाडस केले. [२०]

## पाटलांचे राजीनामे :

सशस्त्र चळवळ भूमिगत राहून करायची ठरवल्यावरच शिराळा पेट्यातील ७२ पाटलांचे राजीनामे घेवून तिथ मुलकी सत्ता झुगारुन प्रतिसरकारच्या कामास सुरवात झाली. पर्यायी सरकार स्थापन झाली यात क्रांतिवीर बाबुजींचा सिंहाचा वाटा आहे. बर्डे गुरुजी , शेख काका , गणपतराव पाटील आदिंचा असा एक ग्रुप होता.

## मणदूर भागातील गुन्हेगारांचा शोध :

कासेगांव, ढेबेवाडी येथील बंगले जाळले याच दरम्यान धनगरवाडीत मणदूर भागात चोरी झाली. या प्रकरणी तपास करुन गुन्हेगार शोधून काढले तेंव्हा ते प्रतिष्ठीत

नागरीक समजले जाणारे गुन्हेगार होते. आणि त्यांनी गरीबाची चोरी केली होती. तो गुन्हा बाबूजींच्या पुढाकाराने निघाला. बाबुजींनी त्या गुन्हेगारांची कोणतीही गय न करता त्यांना स्वत: हून शासन दिले. हा प्रतिसरकारच्या न्यायालयातील पहिला गुन्हा व त्यास योग्य शासन मिळालेले पहिले उदहारण.

## पोलिसांच्यावर चाल :

चरण येथे पोलीस सारा वसुली साठी आले असता. बाबुजी व त्यांचे सहकारी धाडसाने पोलीसांच्यावर चालून गेले. आणि पोलीसांच्या बंदूका काढून घेतल्या. शिराळ्याचा महाळकरी ( तहसिलदार ) जो शासनाचे (ब्रिटीशांचे ) काम करीत होता. त्याला भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांनी अटक केली. गुंडांनी दहशतीने गोरगरीब जनतेला जमिनींची खोटी कागदपत्रे केलेली फाडून टाकली व त्या गुंडांना शिक्षा केली. यामध्ये बाबुजी आघाडीवर होतेच.

## आणेगावच्या पाटलास शासन :

तांबव्याचे ( तालुका कराड ) रंगनाथ पाटील व चंदर चव्हाण या दोघांना आणे गावच्या पाटलाने विश्वासघाताने कैद केले. त्यामुळे त्याला ५०० / - रु व तलवार बक्षिस मिळाली. तेंव्हा जिल्ह्याच्या सर्व ग्रुपने आणेगावच्या पाटलास शासन करायचे ठरले. सर्वांनी त्याच्यावर रात्रीचा छापा घातला. परंतू त्या पाटलाच्या पाटीशी सर्व गांव असल्याने स्वातंत्र्य सैनिकांना आणेगावकऱ्यांशी सामना करावा लागला. सर्व गाव काठ्या - कुऱ्हाडी घेवून आले. त्यावेळी बाबुजींनी फेटा बांदून वरुन चारपदरी घोंगड्याची टापर बांधली होती. त्यांच्या डोक्यावर कुऱ्हाडीचा वार झाल्याने चारपदरी चादर व घोंगड्याची घोळ फाटून डोक्याला जखम झाली होती. परंतू कराड तालुक्यातील आणे गावच्या पाटलाला मिळालेले

बक्षिस ५०० /- रु व तलवार या स्वातंत्र्य वीरांनी परत आणली. या कामी जिल्ह्यातील बर्डे मास्तर यांच्यासहीत इतरही कार्यकर्ते होते.

### डिग्रज पोष्टाची लुट :

डिग्रज पोष्ट लुटले तेंव्हा बाबुजी , बर्डे गुरुजी , नेमिनाथ कत्ते गुरुजी असे तिघे होते. तेंव्हा बाबुजींच्या गोळीबारात दोन लोक बळी पडले. बाबुजींच्यावर गुन्हा दाखल झाला. [२१]

### दरोडेखोरांचा बंदोबस्त :

माणिकवाडीचा विष्णु पैलवान, पेठेचा म्हादू रामोशी हे दरोडेखोर जनतेस त्रास देत व स्वातंत्र्य सैनिकांना पकडून देत. म्हणून पेठेच्या पहिलवानावर छापा घातला असता तो पेठ्यातून पळून गेला. नंतर चंद्रु पाटील त्यास माफ करा म्हणून विष्णूस घेवून आला त्यास बाबुजी पाटणकर, बर्डे गुरूजी आदी कार्यकर्त्यांनी माफ केले. नंतर चंद्रु पाटील म्हणाला ''शेणेचा मारुती रामोशी स्वातंत्र्य सैनिक वाटेगाव ग्रुपला भेटू इच्छितो'' म्हणून शेणेच्या मारुती रामोशीशी भेटण्याची वेळ, ठिकाण व दिवस ठरले. परंतू त्यावेळी तो आला नाही. बर्डे गुरूजी व बाबुजी पाटणकर ठरलेल्या स्थानापासून दूर होते .(सुरूलला) मारूती रामोशी ससैन्य आला त्याने तीनशे गोळ्या झाडल्या, आणि पोलीसांच्या गोळ्या संपल्यावर ते कराड तालुक्यातील शिरंबे पोलीस ठाण्याकडे पळाले. तिथ पर्यंत त्यांना ताणत नेले. मारुती रामोशीने बर्डे गुरूजींना पकडून देण्याचा चंग बांधला होता. म्हणून सर्वांनी त्याला पकडण्यासाठी त्याचा पाठलाग सुरू केला. परंतु पळताना मारूती रामोशीचा पाय मोडला. त्यानंतर तो एके ठिकाणी रहात असल्याची बातमी मिळाली. कासेगावच्या मारूती माळी याने त्यास आश्रय देवून शेतात कडब्याच्या बूचाडात लपवून ठेवले होते. ही बातमी समजताच स्वातंत्र्य सैनिकांनी ते बूचाड वेढले. मारुती रामोशी त्याचे दोन साथीदार

हत्यारबंद होते. स्वातंत्र्य सैनिकांनी बुचाड पेटवून दिल्यावर तो बाहेर आला आणि शेख काकांची गोळी त्याच्या छातीतून आरपार गेली. अशाप्रकारे इंग्रजांना सहाय्य करणाऱ्या गुंडास देहांत शासन दिले.[२२]

## मावशी गावातील चोरीचा छडा :

पाटण तालुक्यातील मावशी गावी विठ्ठलराव मावशीकर यांचे बैल चोरट्यांनी पळवले. त्यावेळी बाबुजींनी स्वतः जावून चोरीचा छडा लावला व चोरांना शासन केले. तेंव्हा सर्व स्वातंत्र्य सैनिकांचा ग्रुप मावशी गावात आहे. ही बातमी पोलीसांना लागल्याने त्यांनी मावशी गावाला वेढा घातला. त्यावेळी सर्व ग्रुप पोलीसांच्या हाती सापडणार परंतू बाबुजी स्वतः पुढे झाले. वेढ्यातून निसटून जायचे ठरवून पेठ्यातील पोलीस आवाक् होवून पहात राहीले आणि बंदूकीचे नेम धरण्यास विसरले दरम्यान बाबुजी वाट काढत ग्रुपसह निघून गेले.

एकंदरीत बाबुजींनी ब्रिटीश सरकारचे हस्तक असणाऱ्यांना जरब बसवून त्यांच्यापासून होणाऱ्या दैनंदिन त्रासातून जनतेला मुक्त करण्याचे मोठे काम केले. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातही आघाडीवर राहून काम केले. स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटीशांशी मुकाबला करण्यासाठी विभाग पाडले होते. त्यासाठी एका विभागाचे प्रमुख बाबुजी होते. सर्व विभाग प्रमुखांना भूमिगतांचा खर्च चालविण्यासाठी कांही रक्कम दिली जात होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व प्रमुख लोकांची बैठक झाल्यानंतर प्रत्येक ग्रुपच्या प्रमुखांनी आपल्या जवळील शिल्लक रक्कम जमा करावी व हिशोब द्यावे असे ठरले. प्रत्येक विभागाने सांगीतले आमच्याकडे शिल्लक नाही परंतू बाबुजींनी मात्र दहा हजार रुपये शिल्लक आहेत त्याचा हिशोब दाखवला. ते दहा हजार रुपये मी शैक्षणिक कामासाठी खर्च करणार आहे असे त्यांनी सांगीतले. सुरवातीस विरोध झाला परंतू नंतर तो मावळला.

स्वातंत्र्यानंतरच्या काळातही बाबुजींच सामाजिक व विधायक काम सातत्याने चालूच होते. कासेगांवी बाजार भरवण्याच्या कामी त्यांचाच पुढाकार होता. आताची बाजारपेठ त्याच्यांच हयातीत पूर्णत्वास गेली. शेतकऱ्याच्या मालाला गावातल्यागावात बाजारपेठ मिळवण्यासाठी चावडी चौकात सहकारी तत्त्वावर अडत दुकान सुरु केले. बाबुजींचे हे काम गावापुरते मर्यादित नव्हतेच. ते एका समाजवादी पक्षाचे जेष्ठ कार्यकर्तेही होते.

१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात इंग्रजांना सहकार्य करणाऱ्या व स्वातंत्र्य सैनिकांना पकडून देणाऱ्या गुंडाना शासन देण्यात बाबुजींनी पुढाकार घेतला होता. त्याची खुनस त्या गुंडांच्या मनात होतीच. त्याचवेळी दरोडेखोरांनी कासेगांवात एका दलीत घरी दरोडा घातला ती तक्रार लोकन्यालयात आली याचा फायदा घेवून त्या गुन्हेगारास हाती धरुन कांही स्थानिक राजकीय लोकांनी व समाजवादी विचारसरणी याभागात पायरोवू नये या राजकीय द्वेषाने महाराष्ट्रपातळी वरील राजकीय लोकांनी या गुंडास सहकार्य करुन १९५९ साली बाबुजींचा शेवट घडवून आणला.

बाबुजी धाडसी , करारी , जिद्दी , ध्येयनिष्ठ बहादूर होते. परंतू अत्यंत प्रामाणीक व न्यायनिष्ठुर होते. कोणत्याही परिस्थितीत त्यांचा हा स्वभाव बदलत नाही. शेवटपर्यंत बाबुजी तळागाळातील शोषित कष्टकरी जनतेसाठी लढले व शेवटी त्यांच्यासाठीच धारातिर्थी पडले.[२३]

# क्रांतिवीर रंगराव दादा पाटील

**जन्म :**

अन्यायाच्या काटेरी चळवळीतून आणि पारतंत्र्याच्या साखळ दंडातून स्वराज्याच्या चळवळीत अग्रणी दिव्याप्रमाणे झिजलेले व आपल्या भारत मातेची सेवा करणारे भूमिपुत्र आणि थोर स्वातंत्र्य सैनिक रंगराव विठ्ठल पाटील उर्फ दादा यांचा जन्म दि. २५ डिसेंबर १९१९ रोजी सांगली जिल्ह्यातील शिगांव या गावी झाला. [२४]

**शिक्षण :**

भाई दादांचे प्राथमिक शिक्षण शिगांव मध्ये व मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण सातारला कर्मवीरांच्या कलपवृक्षाखाली रयत शिक्षण संस्थेत झाले. १९३६ साली महाविद्यालयात शिक्षणासाठी राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे दाखल झाले. या विद्यार्थीदशेपासून त्यांना सार्वजनिक कार्याची आवड लागली. त्यांचे आई वडील फार कष्टाळू, आपला संसार सुखासमाधानाने चालविणे त्यातून गोरगरीबांची सेवा करणे हा त्यांचा मुळ पिंड होता. त्यांचेच संस्कार दादांच्यावर झाले. आपला एकुलता एक मुलगा म्हणून आई - वडील त्यांची काळजी घेत. दादांनी चांगल शिक्षण घेवून मोठे व्हावे हि अपेक्षा होती. ती फोल ठरली. मुलगाच तसा चळवळ्या , वळवल्या , खोडकर ! त्यांनी अर्धवट शिक्षण सोडले आणि ते जनहिताची कामे करु लागले. [२५]

विद्यार्थी दशेत असताना गो. ग. आगरकर , म. फुले , छ. शाहू महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा पगडा त्यांच्या मनावर खोलवर रुजला व मुरला आणि त्यातून त्यांनी त्याग , निती , चारित्र्य व संघर्ष यांचा आदर्श घेवून , नुसते विचार न मांडता , ते समाजाच्यागळी उत्तरवण्यासाठी संघर्ष करु लागले. यातूनच समाजाची प्रगती

आणि माणसातला माणूस जागा होईल. संघर्ष हेच माणूस घडविण्याचे प्रभावी साधन शस्त्र म्हणून त्याच दिशेने त्यांनी आपली वाटचाल सुरु केली.

राजाराम कॉलेज मध्ये असताना आपल्या अमोल वक्तृत्व शैलीने त्यांनी आपल्या वर्गमित्रांना अक्षरशः भारुन टाकले आणि याचाच परिणाम होवून १९३७ साली त्यांच्या वर्गातील ४४ पैकी ४० विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली. [२६]

सत्ता संपती व सुखाची हाव न धरता पोटापुरत मिळल त्यावर समाधान मानायच आणि समाजासाठी जीवन व्यतित करायच हाच वारसा दादांनी पुढे चालू ठेवला.

गावांतील अस्पृश्य समाजावर होणारे अन्याय दादांना सहन होत नसत. गावांतील एका समाजकंटकाने एका अस्पृश्य महिलेची छेड काढल्या बरोबर दादांनी त्याला एव थोबाड रंगवून तिची सुटका केली. यातूनच अन्यायाला प्रतिकार करण्याची शक्ती वाढीला लागली.

दादांनी दुय्यम शिक्षणात प्रवेश केला त्यावेळी समाज सुधारकांचा अभ्यास करताना आगरकरांच्या जीवनपटाचा अधिक परिणाम झालेला दिसतो आगरकर वैयक्तिक जीवनात त्यागी होते त्यांची नीती व चारित्र्य आदर्श होते. संघर्षाशिवाय पुढाऱ्यास समाजाची प्रगती घडवून आणता येत नाही. म्हणून आगरकर संघर्षास तयार असत. संघर्षानेच माणूस घडवणे हे दादांचे ब्रिदवाक्य आहे. याच विचारातून दादा राजकारणाकडे वळले.

## राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश :

१९३७ च्या निवडणूकीत राष्ट्रीय काँग्रेसने भाग घेण्याचे ठरवले महात्मा गांधींनी त्याप्रमाणे सर्वांना आदेश दिला. लोकांना समता, स्वातंत्र्य व लोकशाही समजावून देता आली पाहीजे म्हणून लोकांची प्रतिनिधित्व करणारी स्वायत्त मंडळे, नगरपालिका, लोकल बोर्ड स्थापन झाली. दादांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश करून लोकांना समता, स्वराज्य व लोकशाही समजावून देण्यासाठी अनेक व्यासपीठे गाजवली. अनेकांना काँग्रसमध्ये आणले.

१९३७ पासून ते १९४८ पर्यंत कॉंग्रेस पक्षाच्या राजकीय चळवळीत त्यांनी भाग घेवून काम केले ते खुर्ची सत्तेसाठी नव्हे तर माणसात राहून माणूसकीची व दीनदुबळ्यांची सेवा करण्यासाठी.[२७] समाजातील अज्ञान, अंध्दश्रध्दा व अनिष्ट रुढी यांचा बिमोड करण्यासाठी त्यांचे राजकारण सरड्याप्रमाणे बदलणारे नव्हते तर ते मानवतेसाठी होते, समाजाच्या उध्दारासाठी होते.

महात्मा गांधीनीं १९४२ मध्ये चलेजाव ची घोषणा केली स्वातंत्र्य संग्रामातील ही सर्वात मोठी व अखेरची चळवळ होती. लाखो लोकांनी या हाकेला प्रतिसाद देवून चळवळीत उडी घेतली. लोकांत अभूतपूर्व उत्साह होता. सारे आपली ताकद एकवटून काम करु लागले. ब्रिटीशांनी ही चळवळ दडपूण टाकण्यासाठी दडपशाही करण्यास सुरवात केली. याचा परिणाम देशात असंतोषाचा भडका उडाला. 'करेंगे या मरेंगे' या गांधींच्या संदेशाने समर्पणाच्या भावनेने जिद्दीने लढत होते. दादांनीही या लढ्यात उडी घेतली. दादांच्या आयुष्यातील महत्वाचा केंद्रबिंदू म्हणजे १९४२ चा धगधगता रणकुंड! पंचवीशीच्या आतील दादा स्वातंत्र्यासाठी ध्येयवेडे होवून काम करू लागले.

क्रांतीसिंह नाना पाटील , नागनाथ नायकवडी , रामानंद भारती , वसंत दादा पाटील , दे. भ. बर्डे गुरुजी , पांडू मास्तर , भाई माधवराव बागल , यशवंतराव चव्हाण यांच्या पासून प्रेरणा घेवून त्यांच्या समवेत काम केले. दक्षिण सातारा जिल्ह्यात चळवळ खऱ्या अर्थाने राबवली.

१९४२ च्या चळवळीत दादा अडीचवर्षे भूमिगत होते. दि. ११ ऑक्टो. १९४२ ते २० नोव्हे. १९४५ पर्यंत त्यांच्यांवर वॉरंट बजावण्यात येवून २ मे १९४४ ते २० नोव्हे. १९४५ या मुदतीत त्यांना जीवंत पकडून देणाऱ्यास ब्रिटीश सरकारने ५००/- रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.[२८] सांगली संस्थान हद्दीतील विश्राम बाग, नांद्रे रेल्वे स्टेशन जाळण्यास त्यांचा मोठा सहभाग होता.

१० सप्टें. १९४२ रोजी इस्लामपूरला मोर्चा निघाला होता. त्याला भरघोस पाठींबा मिळवण्यासाठी रंगराव दादा व त्यांच्या सहकाऱ्याकडे कांही गावाचीप्रमुख जवाबदारी सोपवऱ्यात आली होती. गावो गावी प्रचार करण्यात दादा आघाडीवर होते. पहाडी आवाजाने, प्रचाराने त्यांनी गावे पिंजून काढली होती. रंगरावदादांचे भाषण म्हंटले कि गावा-गावातून लहानथोर स्त्रि-पुरुष आपली कामे बाजूला ठेवून जमा होत. त्यांच्या भाषणाने प्रभावित होवून राजकिय प्रवाहात आपोआप सामील होत असे. दि. ७ सप्टें. १९४२ मल्लीकार्जून टेकडीवर सभा घेतली त्या सभेला प्रचंड जनसमुदाय जमला होता. ही सभा घेण्यामध्ये त्यांच्या सहकाऱ्यात ते सर्वात आघाडीवर होते. त्यामुळे मोर्चाचे नियोजन , व लोकांचे धैर्य वाढवण्यात त्यांचा उपयोग होत असे. दादांना पकडण ब्रिटीशांना आव्हानच होते. बक्षीस जाहीर करुनही दादा लवकर सापडू शकले नाहीत. दादा ताब्यात मिळावे यासाठी त्यांच्या घरच्यांना ताब्यात घेतले. त्यांची शिगांव येथील सर्व मालमत्ता जप्त केली. तरीही दादा वधले नाहीत. [२९]

अखेर ब्रिटीशांनी दादा बेसावध असताना २४ जुलै १९४५ रोजी त्यांना अटक करुन आष्टा लॉकअप मध्ये ठेवले .[३०] नंतर नाशिक , येरवडा जेल मध्ये १ वर्षे २ महीने शिक्षा भोगून १८ डिसेंबर १९४६ रोजी त्यांची बिनशर्त सुटका झाली. त्यांना एकूण १४ महिने कारावास भोगावा लागला.

दादांचे प्रभावी वकतृत्त्व व कर्तृत्व लक्षात घेवून १९४६ मध्ये सातारा जिल्हा कॉंग्रेस कार्यकारणीवर वाळवा तालुका प्रतिनिधी म्हणून निवड झाली. त्यानंतर सातारा जिल्हा कॉंग्रेस समितीचे मानद सचिव म्हणून त्यांनी दीड - दोन वर्षे काम केले.[३१]

महात्मा गांधीच्या वधानंतर कॉंग्रेस मध्ये घटनात्मक बदल झाला. तो त्यांना पटला नाही. यावेळी प्रभावी नेतृत्व करणारी मंडळीही कॉंग्रेस पक्षातून बाहेर पडली. आणि शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. यात दे. भ. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत , ए. के. खाडीलकर , तुळशीदास जाधव , भाई माधवराव बागल , नाना

पाटील यात दादाही सहभागी झाले. त्यांच्या समवेत राहून शे. का. पक्षाचे काम करु लागले. ग्रामीण भाषेत आपली वकतृत्त्व कला चांगली जोपासली असल्याने प्रतिसरकारचे सुप्रसिध्द स्वातंत्र्य सैनिक व शे.का. पक्षाचे आद्यप्रवर्तक व प्रचारक म्हणून शे. का. पक्षाच्या नेत्यांनी त्यांना कधीच दूर ठेवले नाही. त्यांची ढाल पुढे करुन बऱ्याच सभा जिंकल्या बराचसा कालखंड शे. का. पक्षात गेल्याने 'भाई रंगरावदादा' लोकप्रियता मिळून महाराष्ट्र त्यांना ओळखू लागला.[३२] त्यातही दादानां समाधान लाभले नाही. सामाजिक सुधारणेचा एक भाग म्हणून व्यसन मुक्ती, हुंडा न घेता लग्न लावणे, ग्रामीण जनतेला शिक्षणाचे महत्व पटवून देणे, प्रसंगी सहकार्य करणे , अंध : श्रध्देवर घणाघाती हल्ला चढवणे आदि उपक्रम सांगली ते वारणे पर्यंत राबवले.

१९४९ साली सातारा जिल्हा स्कूल बोर्डावर शे. का. पक्षातर्फे निवडून आल्यानंतर लोकहीताची कामे करुन भ्रष्टाचार निपटून काढला. वारणा सहकारी साखर कारखाना उभारणीत मोठा सहभाग होता. १९५६ ते ५८ तालुका सुपरवायझर युनियनचे चेअरमन आणि डिस्ट्रिक्ट को. - ऑप बोर्डावर डायरेक्टर , इस्लामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत ७ वर्षे सभासद , उपाध्यक्ष , अध्यक्ष म्हणूनही काम केले.

ग्रामीण भागातील मुला - मुलींची शिक्षणाची व्यवस्था उत्तम व्हावी म्हणून वाळवे तालुक्यात माध्यमीक शाळा काढण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समवेत फिरुन १५ ते २० हायस्कुले काढली. ती चांगल्या प्रकारे चालली आहेत. सध्या कोल्हापूर ताराराणी विद्यापिठाचे उपाध्यक्ष म्हणून काम करीत आहेत.[३३]

१९७३ साली दिल्लीत स्वातंत्र्य सैनिकांचे अधिवेशन झाले. यात सक्रियभाग घेवून महाराष्ट्राचे राजकारण, औद्यागिक , कृषि विकास , बेकारी निर्मूलन , अस्पृश्यता , शेतकरी, शेतमजूर सामान्य माणसांची सुखदुःखे दादांनी त्यांच्या कानावर घालुन त्यांचे प्रश्न निकडीने सोडवण्याचा प्रयत्न केला.

सांगली जिल्हा स्वातंत्र्य सैनिक सन्मान समितीचे अनेक वर्षे अध्यक्ष होते. १९८३ साली शासकीय गौरव समितीचे सदस्य व जून १९९० ला अध्यक्ष , महाराष्ट्र प्रदेश आय काँग्रेस कडून जिल्हा स्वातंत्र्य सैनिक कन्वीयर (संघटक ) म्हणून नियुक्ती. स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन सवलती व त्यांचे प्रश्न शासनात संघर्ष करुन सोडवून घेतले, व घेत आहेत. शासकिय अधिकाऱ्याकडून होणारे अन्याय , अत्याचार , आणि कार्यकर्त्यातील लाचारीवृत्ती विरोधी त्यांनी आजपर्यंत हजारो सभातून घणाघाती टिका करुन त्यांचे वाभाडे काढून भोळ्या भाबड्या लोकांना प्रकाशात नेवून अगदी तेजस्वी ताऱ्याप्रमाणे काम करीत आहेत.

दादा ज्या ज्या पदावर गेले तेथील प्रशासन अगदी स्वच्छ व चोख ठेवले आणि स्वत: धुतल्या तांदळासारखे स्वच्छ राहीले. लोभ, मोह टाकून भ्रष्टाचाराला आळा घातला. दादांच्या राजकीय व सामाजिक जीवन घडणीत पत्नी कल्पनादेवीचा सिंहाचा वाटा आहे.

दादा म्हणजे आजच्या नवयुवकांचे श्रध्दास्थान व आशास्थान आहे.

## लक्ष्मणराव गणेश कुलकर्णी उर्फ धन्वंतरी दादा

धन्वंतरी दादा यांचे साताऱ्च्या पत्रीसरकार (प्रतिसरकार) मधल्या सहयोगाचे विवेचन करावयाचे झाल्यास ते दोन विभागामध्ये करावे लागेल पैकी एक भाग म्हणजे भूमिगत होण्यापूर्वीचा काळ की ज्यामध्ये ते स्वातंत्र्य चळवळीत उघडपणे भाग घेत होते. दुसरा कालखंड म्हणजे भूमिगत राहून केलेले कार्य. सन १९३० पासून देशात स्वातंत्र्याचे वारे वाहत होते. त्यामुळे सामान्यातील सामान्य माणूस सुध्दा गांधी, नेहरु, पटेल, सुभाषचंद्र बोस इ. बद्दल माहिती ऐकण्यास उत्सुक होते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा केसरी खेड्यापाड्यात पोहचला होता, त्याचे सार्वजनिक वाचन होत होते. धन्वंतरी दादा तब्येतीने सुदृढ होते. धाडस हा मुळचा स्वभाव होता. कृष्णेच्या महापूरात उड्या घेवून पैल तीर गाठणे हा त्याचा आवडता छंद होता. अशा धाडसी माणसास स्वातंत्र्य चळवळीचे आकर्षण वाटणे सहाजिकच स्वभावत:च होते. १९३२ साली कराड येथे स्वतंत्रपणे आयुर्वेद चिकित्सा पध्दतीचा दवाखाना सुरु केला. पुढे अल्पावधीतच ओगलेवाडी, मसुर व उंब्रज येथे ही दवाखाने सुरु केले हे सर्व संभाळून ते 'ब्ल्यु गार्ड' (सेमि मिलीटरी) दलात सामील झाले. उद्देश एकच होता की यात भरती होवून फ्रंटवर जायाचे व पुढे सुभाष बाबूंच्या फौजेत सामील व्हायचे.[३४] ब्राम्हण असणे, ब्ल्यु गार्ड मध्ये असणे व आर. एस. एस. मध्ये आहेत यांचा संशय असणे या तीन कारणांनी स्वातंत्र्य लढ्यात सहजासहजी प्रवेश मिळाला नाही.

### स्वातंत्र्य लढ्यात सहभाग :

कऱ्हाडला डी. जी. देशपांडे नावाचे ग्रहस्थ होते. त्याकाळात ते ग्रॅज्युएट होते व स्वातंत्र्य लढ्यातील कार्यकर्त्यांच्या विश्वासातील होते. त्याचा परिचय धन्वंतरींशीही होता. धन्वंतरीनीही त्यांच्याकडे स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्याची इच्छा प्रकट केली. २ - ४ वेळा हा विषय झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांची ओगलेवाडी मुक्कामी डी. जी. देशपांडे

यांनी गाठ घालून दिली . यशवंतराव चव्हाण माणूस पारखी त्यांनी इतकेच सांगीतले की तुमच्यावर ब्रिटीश सरकारचा अजून संशय नाही. ज्यावेळी संशय येईल त्यावेळी तुम्ही भूमिगतांमध्ये सामील व्हा. तो पर्यंत उघड कार्य करीत राहीला तरी चालेल. आम्ही २-३ वेळा प्रयत्न करुनही शिरवडे येथील रेल्वे स्टेशन जाळू शकलो नाही. तेंव्हा स्टेशन जाळून आमच्यात सहभागी व्हा.[३५] ही तुमची परीक्षा आहे. पुढे कराड येथील मित्रांच्या सहकार्याने त्यांनी शिरवडे येथील रेल्वे स्टेशन जाळून भस्मसात केले. व ४ बंदुका व काडतुसे पळवून आणली.[३६]

## भूमिगत कार्य :

धन्वतरी दादा भूमिगत झाले मुळात प्रकृती अतिशय ठणठणीत कमाविलेले शरीर व निकोप. त्याकाळात कराड येथे महादेवराव जाधव ग्रुप पारज येथे बुवा म्हावशीकर ग्रुप कासेगांव - वाटेगांव येथे बाबुजी पाटणकर व बर्डे गुरुजी ग्रुप , शिराळा पांडुमास्तर व बाबुराव चरणकर , वाळवा येथे नागनाथ नायकवडी ग्रुप , सांगली - वसंतराव दादा ग्रुप , रेल्वे लाइनच्या पूर्वेस - जी. डी. लाड व नाना पाटील यांचा ग्रुप कार्यरत होता. त्या काळात एकमेकाशी संपर्क साधण्याचे साधन नव्हते. पोष्टे , टेलीफोन , तारा करणे यांचा उपयोग भूमिगतांना अजिबात नव्हता. तेंव्हा सर्व ग्रुपशी संपर्क ( Co - Ordination )चे महत्वाचे काम त्यांनी केले. सगळ्यांचा एकजुटीपणा आणण्याचा धन्वंतरी दादांनी प्रयत्न केला. कांही काळ त्यांनी जिल्ह्याचे डिक्टेटर म्हणून काम पाहीले. [३७] प्रत्येक ग्रुपला त्यातील कार्यकर्त्यांनां कांहीना कांही अडचणी असावयाच्या त्याचे निराकरण करणे. आर्थिक नियोजन करणे, चळवळीसाठी पैसा उभा करणे. या चळवळीत न्यायदानाचे काम भूमिगत असतानाही होत असे. न्यायदानाचे काम करणे व एक समयाच्छेदे करुन जी कामे करावयाची त्याची सर्व ग्रुप कडून कामे करुन घेणे. उदहारणार्थ १९४३ -४४ यावर्षी वारणे पासून निरा नदी पर्यंत एकाच दिवशी एकाच रात्री म्हणजे रात्री १२ वा. टेलीफोनच्या तारा

तोडण्याचा कार्यक्रम होता. विशेष म्हणजे त्याच रात्री १२ वा. निरेपासून वारणे पर्यंत डांबावर एक ही तार सरळ राहीली नाही. ब्रिटीश सरकारही चक्रावून गेले. त्याच्या दफ्तरी तर १५० ते २०० लोकांची नावे होती. या १५० ते २०० लोकांनी एकारात्रीत एवढ्या सघंटीतपणे हे कार्य कसेकाय पार पाडले. सर्व देशावर जरी ब्रिटीशांचे राज्य असले तरी सातारा जिल्ह्यावर ते कधीच स्थिर नव्हते. हा तारा तोडण्याचा कार्यक्रम एक समयाच्छेदे करुन झाला याचे कारण त्या मागवा असलेला ( Co - Ordination ) संयोजक. [३८] धन्वंतरी यांचा संचार केवल सातारा जिल्ह्यापूरताच मर्यादीत नव्हता. तर ज्या ज्या वेळी ब्रिटीश सैन्य व पोलीस यांचे जिल्ह्यावर प्रेशर येत असे त्या त्या वेळी जिल्ह्याच्या बाहेर राहून ही कार्य करावे लागत असे. असेच एकदा मिलीटरी सैनिक व पोलीस यांनी सर्व जिल्ह्या पिंजून काढला व भूमिगत कार्यकर्त्यांची धरपकड सुरू केली. त्यावेळी अनेक कार्यकर्ते जिल्ह्याच्या बाहेर निघून गेले. त्याप्रमाने धन्वंतरी दादा हे बेळगांवला गेले. तेथील भूमिगत ग्रुपमध्ये मिसळून गेले. रेल्वे स्टेशन कसे जाळावयाचे हे प्रात्यक्षिक एक रेल्वे स्टेशन जाळून करुन दाखवले. कांही दिवसांनी सातारा जिल्ह्यातील धरपकडीचे सत्र कमी झाल्यावर पुन्हा सातारा जिल्ह्यात काम सुरु केले. [३९]

सर्व भारतात उत्तरप्रदेश मध्ये बालीया जिल्हा व महाराष्ट्रात सातारा जिल्हा या दोनच जिल्ह्यामध्ये वैशिष्ट्य पूर्ण स्वातंत्र्याचा लढा लढला गेला. पैकी बालीया जिल्ह्यातील लढा हा इंग्रजानी चिरडून टाकला. सातारा जिल्ह्यातील हा लढा शेवट पर्यत चालू राहीला. त्या काळात सुध्दा या लढ्या विषयी दुमत होते. कॉंग्रेसचेच कांही अग्रणी हा लढा गांधींजीच्या अंहिसात्मक सत्याग्रहात बसत नाही म्हणून विरोध करीत असत. पुढे हा वाद गांधींजींच्या कानावर गेला. ज्यावेळी गांधींजींचा मुक्काम पाचगणी येथे होता, त्यावेळी कांही प्रमुख भूमिगत कार्यकर्ते गांधींजींना भेटले त्यात धन्वंतरी दादा यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. सातारा जिल्ह्यामधून ब्रिटीश सत्ता कधी खिळखिळी करुन टाकली व जे समाजकंटक आहेत . त्यांच्या पासून गोरगरीब जनतेस अन्याय सहन करावा लागतो.

त्यांच्यावर कशी दहशत निर्माण झालेली आहे. काँग्रेस सेवादलाचे, न्यायदानाचे , साक्षरतेचे , व स्वालंबनाचे कार्यक्रम कसे राबवले जातात हे पटवून दिले. या चळवळीस अकारण कांही लोकांनी बदनाम केले आहे असे धन्वंतरी दादा यांनी पटवून दिले. [४०] गांधीजींनी सर्व गोष्टीचा विचार करुन हा लढा जर अंत : प्रेरणेने चालू केला असेल , यात कुणावरही अन्याय होत नसेल तर चालू ठेवणेस माझी कांहीही हरकत नाही असे सांगितले. धन्वंतरी दादा हे स्वभावत: च प्रसिध्दी पराडमुख ते भूमिगत असताना त्याकाळामध्ये त्यांना पकडून देण्याऱ्यास बक्षीस लावले होते.[४१] त्या अमिषाने व विश्वासघाताने एका इसमाने त्यांना पकडून दिले. भूमिगत असताना त्यांच्या अनेक कामांची दखल ब्रिटीश शासनाने घेतलेली होती. जंग - जंग पछाडूनसुध्दा धन्वंतरी हे ब्रिटीशांच्या हाती लागले नव्हते. म्हणून ज्यावेळी त्यांना पाहण्यासाठी कराडला येवूनगेले बाकी कुणाला त्रास हावू नये म्हणून सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्याच्या दृष्टीने ज्या ज्या घटना घडल्या त्यासर्व घटनांची जबाबदारी त्यांनी स्विकारुन त्या प्रमाणे लेखी जबाब त्यांनी तुरुंगात असताना दिला. संपूर्ण वेळ त्यांनी आपल्या देशासाठी दिला.

## वाळवा तालुक्यातील हुतात्मा स्मारके

१) पडवळवाडी : अ) बाबूराव धोंडी कोकाटे.

रा. पडवळवाडी, ता. वाळवा

ब) प्रतापराव लक्ष्मण पाटील.

रा. ढ्याकूड, ता.रायबाग, जि.बेळगांव

२) आष्टा : केशवराव रामचंद्र तळवळकर

रा. आष्टा, ता.वाळवा

३) वाळवा : अ) किसन आत्माराम अहिर.

रा. वाळवा, ता. वाळवा

ब) गणपती बाबाजी पाटील.

रा. कुरळूप, ता.वाळवा

४) कापूसखेड : शंकर बाळा खूडे

रा. कापूसखेड, ता. वाळवा

५) इस्लामपूर : अ) विष्णू भाऊ बारपट्टे.

रा. कामेरी, ता. वाळवा

ब) उमा शंकर रवि शंकर पंड्या.

रा. किर्लोस्करवाडी, ता.तासगांव

६) कामेरी : अ) विष्णू भाऊ बारपट्टे.

रा. कामेरी, ता. वाळवा

ब) उमा शंकर रवि शंकर पंड्या.

रा. किर्लोस्करवाडी, ता.तासगांव

# वाळवा तालुक्यातील हुतात्मे

## १) हुतात्मा - बाबूराव धोंडी कोकाटे

बाबूराव धोंडी कोकाटे यांचा जन्म १९ जून, १९२० ला पडवळवाडी येथे झाला होता. महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते कोल्हापूरला होते. शालेय शिक्षणापासूनच त्यांना स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली. परकीयांच्या बद्दल त्यांना तिटकारा होता. महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून त्यांनी १९४२ च्या चलेजाव चळवळीत भाग घेतला. बाबूराव मे, १९४६ मध्ये वाळवा तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक गावी गेले असता तेथे त्या रात्री झालेल्या ब्रिटीश गोळीबारात हुतात्मा झाले.[४२]

## २) हुतात्मा - प्रतापराव लक्ष्मणराव पाटील

हुतात्मा प्रतापराव लक्ष्मण पाटील हे बेळगाव जिल्ह्यातील रायबाग तालुक्यातील ढयाकूड गावचे राहणारे होते. १९४२ च्या चलेजाव चळवळीचे लोण गावपातळीपासून ते शहरापर्यंत पोहोचले होते. भूमिगत कार्यकर्त्यांच्या ठिकठिकाणी सभा होत होत्या अशाच एका गुप्त बैठकिला प्रताप पाटील आले होते. नागनाथ नायकवडी आणि साथीदारांची बैठक ऐतवडे बुद्रुक येथील जैन बस्तीत भरली होती. त्या रात्रीच प्रताप पाटील यांचा ऐतवड्याच्या आदगौंडा दादा पाटील यांच्या घरी अज्ञात इसमांनी बळी घेतला. दि. २२ मे १९४६ रोजी प्रताप पाटील हुतात्मा झाले.[४३]

## ३) हुतात्मा - केशव तळवळकर

हुतात्मा केशव तळवळकर हे वाळवा तालुक्यातील आष्टा गावचे. त्यांचे संपूर्ण नाव केशवराव रामचंद्र तळवळकर. त्यांनी १९३० ते १९४२ या स्वातंत्र्य युध्दात अतुलनीय असे कार्य केले आहे. त्यांतच त्यांचे ब्रिटीश गोळीबारत निधन झाले. ते अमर झाले.[४४]

## ४) हुतात्मा - किसन आत्माराम अहिर

हुतात्मा किसन आत्माराम अहिर यांचा जन्म १५ ऑक्टोबर, १९१५ रोजी वाळवा येथे झाला होता. त्यांचे शिक्षण मराठी पाचवी पर्यंत झाले होते. भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ब्रिटीश सरकार विरुध्द फौजी संघटना उभारण्याचा जो प्रयत्न वाळवा, शिराळा भागात झाला त्यात किसन अहिर अग्रभागी होते.

किसन अहिर व त्यांच्या सहकाऱ्यांनी सरकारी खजिना लुटणे, कचेऱ्या जाळणे, सरकारी मालाची नासधूस करणे येनकेन प्रकारे सरकारला नामोहरम करणे असे कार्य चालू ठेवले. त्याचबरोबर गावोगावच्या गुंडांचा बंदोबस्त करणे, सरकारी यंत्रणेला बातम्या देणाऱ्यांच्यात दहशत बसविणे यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

किसन अहिर व त्यांचे साथीदार यांच्या फौजी संघटनेस पकडण्यासाठी ब्रिटीशांनी जंग जंग पछाडले. १९४६ च्या एप्रिल महिन्यात पोलीसांच्या एका छाप्यात शिराळा तालुक्यातील मणदूरच्या डोंगरात किसन अहिरला पोलीसांनी घेरले त्यावेळी पोलीसांनी केलेल्या गोळीबारात किसन अहिर यांना हौतात्म्य लाभले.[४५]

## ५) हुतात्मा - गणपती बाबाजी पाटील

हुतात्मा गणपती बाबाजी पाटील यांचा जन्म १९१२ साली कुरळूप येथे झाला. त्याचे शिक्षण इयत्ता ४ थी पर्यंत झाले. गणपती बाबाजी पाटील हे काँग्रेसचे कार्यकर्ते होते. शाळेत असताना त्यांना स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली. काँग्रेस पक्षाचे कार्य करीत करीत त्यांनी १९४२ च्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला, सरकारी मालाची नासधूस करणे, दळणवळणाची साधने नष्ट करणे. अशाच एका कटात भाग घेतल्याचा त्यांच्यावर आरोप होता. १९४२ च्या चलेजाव चळवळीत ब्रिटीश पोलीसांना प्रतिकार करीत असताना पोलीसांच्या गोळीबारात एक गोळी लागून ठार झाले.[४६]

## ६) हुतात्मा - शंकर बाळा खुडे

हुतात्मा बाळा शंकर खुडे हे वाळवा तालुक्यातील कापूसखेड गावचे. १९४२ च्या चलेजाव चळवळीत त्यांनी भाग घेतला. इस्लामपूर येथील मोर्चात ते सहभागी झाले. त्यातच त्यांना अटक झाली. त्यांना बेळगाव जवळील हिंदलगा तुरूंगात ठेवले होते. तेथे अतिसाराने त्यांचा २४ डिसेंबर, १९४२ रोजी मृत्यु झाला.[४७]

## ७) हुतात्मा - पंड्या इंजिनियर व विष्णू बारपट्टे

१९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ज्या शूर वीरांनी आत्मबलिदान केले व लढता लढता धारातीर्थी पडले त्यात क्रां. हुतात्मा पंड्या व विष्णू बारपट्टे यांचे स्थान आदरणीय आहे.

क्रां. उमाशंकर रविशंकर पंड्या हे मुळचे नागपूरचे. नागपूरचे प्राथमिक शाळेत एक अत्यंत हुशार व नावाजलेले विद्यार्थी, प्रकृती सुदृढ, क्रिडा क्षेत्रातही त्यांना छंद होता. त्यात त्यांनी अनेक प्राविण्य पदके पटकावली होती. अनेक कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला होता. प्रत्येक कामात जातीने लक्ष घालीत. राष्ट्र सेवादलात सैनिक म्हणून ते काम करीत होते.

मॅट्रीक परीक्षा चांगल्या तऱ्हेने उत्तीर्ण झाल्यानंतर बनारस हिंदु युनिर्व्हसिटीची इंजिनियरची पदवी परीक्षा उत्त्तीर्ण झाले. आणि १९४० साली किर्लोस्कर कारखान्यात इलेक्ट्रीक मोटर्स विभाग इंजि. म्हणून नोकरीस लागले. स्वभाव प्रेमळ व मनमिळावू, संघटन कौशल्यही चांगले होते. त्यामुळे अल्पावधीतच त्यांनी कामगार, मालक व अधिकाऱ्यांची मने आकर्षुण घेतली. म. गांधींनी १९४२ चा 'चले जाव' स्वातंत्र्य लढा पुकारताच त्यात त्यांनी प्राणपणाने उडी घेतली. आई, वडील, बायको, मुले, घरदार, संपत्ती यांची फिकीर केली नाही. तासगांवला ३ सप्टेंबरला मोर्चा नेवून तो यशस्वी करण्यात त्यांचा पुढाकार होता.

क्रां. हुतात्मा विष्णू खंडू बारपट्टे हा कामेरीचा सामान्य घराण्यातील उत्साही तरुण. म.गांधींच्या 'चले जाव' घोषणेचे स्वागत करून त्यासाठी वाट्टेल तो त्याग करण्यास पुढे आला. विष्णू घरातून बाहेर पडताना आई म्हणाली 'अरे विष्णू निघालास कोठे? स्वयपांक झाला आहे जेवून घे' विष्णूला स्वराज्याचा ध्यास लागला होता. तो तडक घराबाहेर पडला आणि मोर्चात सहभागी झाला. उपाशी पोटी विष्णू घरी परत आला नाही. स्वराज्याचा घुटका घेतच तो अमर हुतात्मा झाला.

इस्लामपूर मामलेदार कचेरीवर राष्ट्रध्वज लावायच्या एका ध्येयाने प्रेरीत होवून पांडू मास्तर व गोविंदराव खोत आपआपल्या मोर्चाचे नेतृत्व करीत होते. किर्लोस्करवाडीतील कामगारांचा मोर्चा निघाला होता तो त्याच मोर्चात सहभागी झाला. मोर्चात असंख्य लोक सामील झाले होते त्यात क्रां. पंड्या व विष्णू बारपट्टे हे राष्ट्रध्वज घेवून आघाडीवर होते. मोर्चा मामलेदार कचेरीजवळ येताच प्रचंड गर्दी झाली. कोण कुठे आहे काही समजु शकत नव्हते. झेंडा मामलेदार कचेरीवर कसा लावता येईल यात प्रत्येकजण गुंग होता. एकमेकांना सांगण्या इतपत व नियोजन करण्यास वेळ नव्हता. पोलीस सज्ज होते. मोर्चा मागे हटविण्याचा प्रयत्न करीत होते पण त्यांना ते अशक्य होते. सगळीकडे गोंधळ माजू लागला. मामलेदार अत्यंत संतप्त झाला. उन्मत झालेल्या मामलेदाराने कशाचाही विचार न करता गोळीबार करण्याचा हुकूम सोडला. पोलीसांच्या पहिल्या फैरीतच एकामागोमाग क्रां. पंड्या इंजि. व विष्णू बारपट्टे बळी पडले आणि हुतात्मा झाले. [४८]

वंदे मातरम व भारत माता की जय याचा घोष करीत धारातीर्थी पडताच दुधोंडीचे जिवंधर कळंत्रे यांनी त्यांच्या हातातील राष्ट्रध्वज आपल्या हातात घेतला व निर्भयपणे पुढे जावू लागले. त्यांच्या पाठोपाठ गोविंद ढोबळे, ज्ञानू शिंदे, मारुती भोसले हे ही होते. तोच बंदुकीची दुसरी गोळी कळंत्रे यांच्या मांडीतून आरपार गेली व तिसरी गोळी दुसऱ्या मांडीस लागल्यामुळे तेही रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर पडले. पाठोपाठ असणारे त्यांचे

साथीदारही जबर जखमी झाले. ज्विंधर कळंत्रे यांचा उजवा पाय जबर जखमी झाल्याने तो तोडून काढावा लागला. देशासाठी त्यांनी जन्माचे अपंगत्व स्विकारले.[४९]

आज पंड्या यांचे हुतात्मा स्मारक इस्लामपूरात व विष्णू बारपट्टे यांचे कामेरी येथे उभारले आहे

## संदर्भ - सुची

१. श्री. रकटे विलासराव यशवंत - कामेरी - मुलाखत

२. श्री. पाटील अविनाश बाबासाहेब - हस्तलिखीत (चंद्रु कारभारी) - पृष्ठ - २

३. स्वा.सै. पाटील एस. बी. - मुलाखत

४. श्री. पाटील अविनाश बाबासाहेब - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - ३

५. स्वा.सै. श्री. देशपांडे डी.जी. - मुलाखत

६. श्री. पाटील रा. तु. - सांगली साताराचे राजकारण - पृष्ठ - ३३

७. स्वा.सै. पाटील रंगराव दादा - मुलाखत

८. स्वा.सै. कापसे सदाशिव शंकर - कामेरी - मुलाखत

९. स्वा.सै. गुरव तातोबा तुकाराम - कामेरी - मुलाखत

१०.श्री पाटील अविनाश बाबासो - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - ७

११.स्वा.सै. पाटील रंगराव कृष्णा - कामेरी - मुलाखत

१२.स्वा.सै. देशपांडे डी. जी. - मुलाखत

१३.संपादक डॉ. देशपांडे दिपा व प्रा. नलगे दिलिप - कर्मयोगी - पृष्ठ - ४१

१४.---- कित्ता ---- पृष्ठ - ४१

१५.स्वा.सै. पाटील रंगराव दादा - मुलाखत

१६.डॉ. देशपांडे दिपा - इस्लामपूर- मुलाखत

१७.स्वा.सै. लाड जी.डी. - कुंडल- मुलाखत

१८.डॉ. पाटणकर भारत - कासेगाव- मुलाखत

१९.स्वा.सै. पाटील मारुती यशवंत - कासेगाव- मुलाखत

२०.स्वा.सै. बर्डे आण्णा रामचंद्र - वाटेगाव- मुलाखत

२१.क्रा. बाबूजी पाटणकर - लोकशास्त्रीय संशोधन व प्रबोधन संस्था, कासेगाव - स्मरणीका (१९९६) - पृष्ठ - २२

२२.स्वा.सै. शिंदे रामचंद्र पांडूरंग - वाटेगांव- मुलाखत

२३.स्वा.सै. श्रीमती पाटणकर इंदुताई - मुलाखत

२४.स्वा.सै. श्री पाटील रंगराव दादा - मुलाखत

२५.दै. सकाळ दि. २५ डिसेंबर १९८९

२६.दै. अग्रदूत दि. २५ डिसेंबर १९८९

२७. ---- कित्ता ----

२८.दै. सकाळ दि. २५ डिसेंबर १९८९

२९.स्वा. सै. वग्याणी बाळासाहेब बापूसाहेब - आष्टा- मुलाखत

३०.दै. सकाळ दि. २५ डिसेंबर १९८९

३१.दै.अग्रदूत दि. २५ डिसेंबर १९८९

३२.स्वा.सै. पाटील रंगराव दादा - मुलाखत

३३.दै. सकाळ दि. २५ डिसेंबर १९८९

३४.श्री. पाटील एस. बी. - मुलाखत

३५.स्वा.सै. पाटील मारुती यशवंत - मुलाखत

३६.डॉ. शिंदे आबासाहेब - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -३९

३७.कुलकर्णी ल. ग. - सातारचे प्रतिसरकार - स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती - पृष्ठ -३५, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३८.स्वा.सै. देशपांडे डी.जी. - मुलाखत

३९.श्री. कुलकर्णी मोहन लक्ष्मण - कासेगांव- मुलाखत

४०.स्वा.सै. जंगले भूपाल कृष्णा - वाटेगांव- मुलाखत

४१.श्री. गोखले पुरूषोत्तम पांडूरंग - जागृत सातारा - पृष्ठ -१९७

४२.स्वा.सै. श्रीमती पाटील राजमती - मुलाखत व दै. सकाळ दि. २७ मे, १९९२ - पृष्ठ -९

४३.दै. सकाळ दि. २७ मे, १९९२ - पृष्ठ -९

४४.स्वा.सै. वग्यानी बाळासाहेब ब्रापूसाहेब - मुलाखत व दै. सकाळ दि. २७ मे, १९९२ - पृष्ठ -९

४५.क्रां. नायकवडी नागनाथ - मुलाखत

४६.स्वा.सै. पाटील एस. बी. - मुलाखत

४७.स्वा.सै. खराडे भगवान पांडूरंग - कापूसखेड - मुलाखत

४८.डॉ. शिंदे आबासाहेब - सातारचे प्रतिसरकार; प्रसंग व व्यक्ति - पृष्ठ -३४

४९.स्वा.सै. पवार रामचंद्र सखाराम - कुंडल- मुलाखत